# प्रस्तावना

# प्रस्तावना

प्रस्तुत शोधप्रबंध भारत पाकिस्तान फाळणीसंबंधी तत्कालीन नेत्यांचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर आधारीत आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधात तत्कालीन नेते महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, बॅ. महंमद अली जीना, मौलाना आझाद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मोजक्याच व महत्त्वाच्या नेत्यांचा फाळणीसंबंधी विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. भारत स्वतंत्र झाला पण अखंड भारताचे भारत व पाकिस्तान या दोन भागात तुकडे झाले. फाळणी ही दुर्दैवी घटना मानली जाते. फाळणीवेळी लक्षावधी निरपराध लोकांची हत्या झाली. एका कोटींच्यावर लोकांना निर्वासित व्हावे लागले. ज्या द्वेषाग्नीने ही आगडोंब पेटविली तो द्वेषाग्नी अद्यापही विझलेला दिसत नाही. आज भारताच्या व पाकिस्तानच्या दोन्ही देशाच्या राजकारणामध्ये प्रत्येक घटनेवर याच मुद्दयांमुळे पेचप्रसंग निर्माण होत आहे.

भारत - पाकिस्तान फाळणी ही काय एका दिवसाची किंवा रात्रीची गोष्ट नव्हती. या फाळणीची बीजे स्वातंत्र्य लढयात रुजल्याची दिसतात. ब्रिटीशांनी हिंदु-मुस्लिमांत तेढ निर्माण करण्याचे कार्य केले कारण हिंदुस्तानात हिंदु-मुस्लीम ऐक्य असेल तर ब्रिटीशांना राज्य करणे सहज शक्य झाले नसते. ब्रिटीशांनी फोडा व झोडा ही प्राचीन काळातील रोमन म्हण उपयोगात आणली होती. या नीतिचा अवलंब करुन ब्रिटीशांनी भारतावर राज्य केले.

भारताची फाळणी ही हिंदु-मुस्लिम या धर्मामध्ये झाली. हिंदु-मुस्लिमांचा जातीवाद फाळणीस कारणीभूत ठरला. मुस्लिमांमध्ये वेगळेपणाची भावना निर्माण करण्यास सर सय्यद अहमद यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रारंभीच्या काळात सर सय्यद अहमद हे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे कट्टर समर्थक असलेले, पुढे कॉंग्रेसचे कट्टर विरोधक आणि ब्रिटीशांचे समर्थ बनले.

त्यांनी १८८० च्या दशकात आपली पूर्वीची भूमिका सोडली आणि हिंदू व मुस्लीम यांचे राजकीय हितसंबंध एकसारखे नसून वेगळे आहेत. सर्व मुस्लिमांनी ब्रिटीश राजवटीशी एकनिष्ठ राहिले पाहिजे अशी भूमिका घेतली. सर सय्यद अहमद यांनीच मुस्लिम जातीयवादाचा पाया घातला.

१८५७ च्या बंडापासून मुसलमान आणि ब्रिटीश राज्यकर्ते यांचे संबंध पूर्ण दुरावले होते. सर सय्यद यांनी भारतातील राजनिष्ठ मुसलमान नावाचे चोपडे लिहून ब्रिटीश राज्यकर्ते आणि भारतीय मुसल्मान यांच्यामधील मैत्रीचे युग सुरु केले. मुस्लीम समाजात आधुनिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने त्यांनी मोहामेडन अँग्लो ओरिएंटल कॉलेज या संस्थेची स्थापना केली. या संस्थेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले तरुण ब्रिटीशनिष्ठ असतील. या दृष्टिनेच सर्व शैक्षणिक योजना आखण्यात आली होती. पुढे या संख्येतूनच अलीगढ मुस्लीम विद्यापीठ हे मुस्लिमांचे वेगळेपण जपणारे केंद्र विकसित झाले. पाकिस्तान निर्मितीमागील ब्रिटीशांच्या कारवाईला सर सय्यद यांच्यापासूनच प्रारंभ होतो. सर सय्यद अहमद यांनी आपल्या लखनौ येथील कुप्रसिध्द भाषणात द्विराष्ट्रवादाचा सिध्दांत मांडला.

स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची बीजे १९३२ मध्ये इंग्लंड येथे केंब्रिज विद्यापीठात शिकत असलेल्या मुस्लिम तरुण रहमत अली यांच्या दहशतवादी विचारामध्ये आढळतात. भारतात जवळपास ७०० वर्षांपर्यंत विदेशी मुसलमानांची सत्ता होती आणि त्यांनी आपले श्रेष्ठत्त्व बहुसंख्य समाजावर शक्तीच्या जोरावर कायम राखले. त्यांनी बहुसंख्य समाजाची पिळवणुक केली. शेवटच्या मुघल , सम्राटाच्या काळात बहुसंख्य सम्माजात विद्रोहाची भावना निर्माण झाली. ही भावनाही बऱ्याच प्रमाणात मुसलमानांच्या पतनाला कारणीभूत आहे. ब्रिटीश शासनाची स्थापना झाली आणि मुस्लीम उच्चवर्णाचे प्रभुत्त्व कमी झाले.

यानंतर काही काळातच बहुसंख्य समाजात जागृतीची मजबुत लाट उसळली. स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ तसेच महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यासारख्या बहुसंख्य समाजाचे नेतृत्त्व करणाऱ्यांनी बहुसंख्य समजाला

अन्यायाविरुध्द शोषणाविरुध्द जागृत केलं. याच पार्श्वभूमीवर १८८५ मध्ये ऐतिहासिक घटनेच्या रुपात अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. यावर बहुसंख्य समाजाच्या नेतृत्त्वाची छाप दिसून येते. काँग्रेस ही हिंदूंची संघटना आहे अशी टीका होऊ लागली. त्यामुळे मुस्लिमांना अशी भीती वाटू लागली की ब्रिटीश साम्राज्यानंतर देशाचे नेतृत्त्व बहुसंख्य समाजाच्या हाती जाईल, त्यामुळेच १९०६ मध्ये नवाब समीमुल्ला यांनी नवाबी थाटात ढाका येथे मुस्लीम लीगची स्थापना केली. येथेच दोन भिन्न देशांच्या निर्मितीची बीजे दिसू लागली. १९०६ पासूनच मुसलमानांनी भारताच्या राजकारणात समाविष्ठ होऊन मुख्य प्रवाहातून स्वतःहून वेगळेपणा दाखवू लागले.

ब्रिटीशांच्या भारतविषयक कुटील नीतीची सुस्पष्ट झलक बंगाल फाळणी वेळी दिसून येते. लॉर्ड कर्झन या ब्रिटीश व्हाईसरॉयनी १९ जुलै १९०५ रोजी बंगालची प्रांताची फाळणी करण्याची आणि मुसलमानांची बहुसंख्य असणाऱ्या पूर्व बंगालचा वेगळा प्रांत स्थापन करण्याची घोषणा केली. मात्र यामुळे बंगालच नव्हे तर सारा देश खवळून उठला. ज्या मुसलमान समाजाला हाताशी धरुन लॉर्ड कर्झनने फाळणी करण्याचे कारस्थान रचले होते. त्या समाजाने ही त्याची योजना फेटाळून लावली होती. ब्रिटीशांचा हिंदू-मुसलमानांत दुही निर्माण करण्याचा प्रयत्न अपयशी ठरला. पण यामुळेच मुसलमानांत अलगतेची भावना निर्माण झाली.

१९०९ मध्ये मोर्ले मिंटो सुधारणांमध्ये इंग्रजांच्या फोडा व झोडा या नीतीअंतर्गत वेगवेगळया निवडणुक व्यवस्थेची योजना करण्यात आली. यामध्ये हिंदू आणि मुसलमानांचा स्वतंत्र प्रतिनिधींच्या निवडीची योजना होती. या व्यवस्थेने स्वतंत्र देशांच्या देशाच्या बीजाला खतपाणी मिळून त्याचे रोपटे बनले. यावेळी मुस्लीम लीग आणि काँग्रेस यांच्यामधील संबंध कटू बनले.

सुदैवाने १९१६ मध्ये श्री लुकाभाई देसाई व लियाकत अली खान यांच्या सहयोगाची बोलणी झाली आणि विभाजनांच्या रोपट्याची वाढ खुंटली. याच काळात महात्मा गांधींच्या काँग्रेस प्रवेशाने स्थिती बदलली. कारण त्याचे स्वप्न

हिंदू-मुस्लीम ऐक्यासह देशाच्या स्वातंत्र्याचे होते. गांधींनी १९२१ च्या असहकार आंदोलनात मुस्लिमांना बरोबर घेतले होते. या आंदोलनात जीनांचाही सहभाग होता. गांधीजींनी खिलाफत चळवळीलाही पूर्णपणे पाठिंबा देवून हिंदू-मुस्लिमांत ऐक्य राखण्याचा प्रयत्न केला.

१९२० ते १९२३ पर्यंत मुस्लीम लीगचे विशेष असे कार्य दिसत नाही. परंतु सायमन कमिशन आणि गोलमेज परिषदांमुळे मुस्लीम लीगमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण झाले. या वेळेपर्यंत पूर्ण जातीयवादी बनलेल्या महंमद अली जीना यांच्याकडे लीगचे नेतृत्त्व आले.

१९३०-३१ मध्ये गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. त्यावेळी लीगने या चळवळीत सामील व्हावे असे गांधीजींनी जाहीर केले. परंतु ही चळवळ हिंदू महासभांसारख्या हिंदू संघटना मुस्लिमांवर कायम वर्चस्व गाविण्यासाठी सुरु केली आहे असा जीनांनी आक्षेप घेतला. १९३० साली लंडन येथे झालेल्या पहिल्या गोलमेज परिषदेवर काँग्रेसने बहिष्कार घातला होता. परंतु जीना मुस्लिम लीगचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहूनही निष्फळ ठरली. शेवटी पंतप्रधान रॅम्से मेक्डोनाल्ड यांच्याकडे जातीय निवाडा जाहीर केला. त्यातील प्रमुख मुद्दे असे -

१ बंगाल व पंजाबमधील अल्पसंख्यांक व मुस्लीम बहुसंख्यांक यांना स्वतंत्र मतदार संघ असतील.

२ ज्या प्रांतात मुस्लीम अल्पसंख्य आहेत त्यांना त्यांचे राजकीय महत्त्व लक्षात घेऊन जादा प्रतिनिधीत्व देण्यात येईल.

३ हिंदूमधील मागास जाती अल्पसंख्यांक समजून त्यांना वेगळा मतदार संघ ठेवण्यात येईल.

४ मुस्लिम, ख्रिश्चन व जमीनदार यांना केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळात राखीव जागा ठेवण्यात येतील. या जातीय निवाडयांमुळे मुसिलम लीगला प्रमाणाबाहेर प्रतिनिधीत्व मिळाले. स्वतंत्र मतदार संघातील मुसलमानांना मिळणारे प्रतिनिधीत्व मुस्लीम

मतदार संघाकडून मिळणार होते. त्यामुळे मुस्लीम हे स्वतंत्र राष्ट्र आहे. या जीना यांच्या द्विराष्ट्रवादाच्या सिध्दांताला पोषक अशीच कृती मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडयाद्वारे केली.

१९०९ च्या मोर्ले मिंटो सुधारणा कायदा १९१९ च्या मॉंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा व १९३५ चा भारत सरकारचा कायदा या कायद्यानुसार ब्रिटीशांनी भारतामध्ये मुस्लिमांना स्वतंत्र अस्तित्व देण्याचा प्रयत्न केला. या सुधारणा कायद्यामुळे मुस्लिमांमध्ये अलगतेची भावना अधिकच वाढीस लागल्याचे दिसून येत आहे.

१९३५ च्या भारतीय शासन अधिनियमानुसार प्रांतिक विधानसभेच्या १९३७ मध्ये पहिल्या निवडणुका झाल्या. मुस्लीम लीगने यात भाग घेऊन काही अंशी यश प्राप्त केले. कॉँग्रेसला यात चांगले यश मिळाले होते. कॉँग्रेसने सरकारे बनविण्याचा निर्णय घेतला. मुस्लीम लीगने बंगाल, आसाम व पंजाबमध्ये कॉँग्रेसबरोबर संमिश्र सरकारे बनविंण्याची इच्छा प्रकट केली व अशी आशा व्यक्त केली की संयुक्त प्रांत व बिहारमध्ये लीगच्या सदस्यांना मंत्रिमंडळात घेतले जाईल पण जातीयवादाला विरोध म्हणून कॉँग्रेसने ही सूचना फेटाळून लावली आणि स्पष्ट केले की, मुस्लिम लीगच्या सदस्यांना मंत्री बनायचे असेल तर त्यांनी कॉँग्रेसच्या प्रतिज्ञा पत्रावर स्वाक्षरी करावी लागेल. कॉँग्रेसची ही सूचना जीनांना मान्य नव्हती. जीनांनी कॉँग्रेसवर टीकेची झोड उठवून असे म्हटले की, कॉँग्रेस म्हणजे हिंदू संघटना आहे आणि ती अल्पसंख्यांकांना चिरडू पाहात आहे.

१९३८ मध्ये मुस्लीम लीगने हिंदू कॉँग्रेसी प्रांतात मुसलमानांवर होत असलेल्या अन्यायाची व अत्याचाराची चौकशी करण्यासाठी पीरपूरच्या राजाच्या नेतृत्त्वाखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने आपल्या अहवालात मुसलमानांवर होत असलेल्या अत्याचाराचा पाढा वाचला. त्यात म्हटले होते, कॉँग्रेस व हिंदू महासभेचा उद्देश एक आहे. जरी कॉँग्रेस स्वतःला जातीयवादी मानत नाही आणि काही कॉँग्रेसजण बरोबर राष्ट्रवादी धोरणाप्रमाणे आचरण

करतात पण अधिकांश काँग्रेसजण हिंदू आहेत आणि अनेक शतकांच्या मुस्लीम व इंग्रज राजवटीनंतर शुध्द हिंदू राज्य निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न आहे, असे या अहवालात म्हणण्यात आले. यामुळे सर्वसाधारण मुसलमानांचे जनमत वेगळया राष्ट्रांच्या विचारांती प्रवाहीत झाले. याचवेळी मुस्लीम लीगने विभाजनाच्या मागणीला जोर धरला.

१९३९ मध्ये दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली आणि काँग्रेस मंत्रीमंडळाने त्याच्या परवानगीशिवाय ब्रिटीनकडून या महायुध्दात भारत भाग घेण्याची घोषणा केल्याच्या निषेधार्थ राजीनामा दिला ही संधी जीना व मुस्लिम यांना आपल्या विभाजनाच्या मागणीसाठी साह्यभूत ठरली.

२० मार्च १९४० रोजी लाहोर येथे भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनात मुस्लीम बहुसंख्यांक प्रदेशाचे स्वतंत्र राज्य बनविण्याची मागणी करणारा ठराव संमत झाला. डॉ. महंमद इक्बाल यांच्या कल्पनेतील रहमत अली यांच्या संज्ञेचा आणि पंजाब, सिंध, वायव्य सरहद्द प्रांत, बलुचिस्तान इत्यादी भूभाग असलेल्या पाकिस्तान हा नवा देश निर्माण करण्याची अधिकृतपणे नागणीपुढे आली. प्रांरभी पाकिस्तान कल्पना १९४० मध्ये वास्तववादी वाटायला लागली. पाकिस्तानच्या मागणीचा ठराव हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीस वेगळी दिशा देणारा ठरला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या पर्वात सर सय्यद अहमद यांनी मुस्लिम अस्मितेचे जे महत्वकांक्षी बीजारोपण केले होते. त्याची फळे जीनांच्या नेतृत्त्वाखाली वाढू लागली. या काळपासून जीना मुस्लिम लीगचे व एकमेव नेते ठरले.

१९४५ मध्ये दुसरे महायुध्द संपले आणि ब्रिटनची जर्जर आर्थिक आणि राजकीय व्यवस्था अनेक देशांचे दबाव, भारतीय लोकांमध्ये स्वातंत्र्याची निर्माण झालेली चेतना, ज्यामुळे गृहयुध्दाची आशंका निर्माण झाली. त्याप्रमाणे १९४६ च्या प्रारंभी भारतीय नौसेनेत झालेला विद्रोह, ब्रिटनमध्ये मजूरगटाच्या लॉर्ड ॲटलीद्वारे सरकारची स्थापना, या प्रकारच्या सगळया कारणाने ब्रिटीशांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचा विचार केला. परिणामस्वरुप २३ मार्च १९४५ ला

लॉर्ड लॉरेन्स, लॉर्ड अलेक्झांडर आणि सर स्टॅफोर्ड क्रिप्स यातील वरिष्ठ मंत्र्यांबरोबर कॅबिनेट मिशन आले. कॅबिनेट मिशनचा उद्देश भारतातील राजकीय व्यवस्थेबद्दल योग्य निर्णय घेणे हा होता.

अखेरच्या वाटाघाटीखाली झालेल्या कॅबिनेट शिष्टमंडळात तेंव्हा जीनांना हवे असलेल्या, मोठया पाकिस्तानची दोन विभागात वाटणी करुन त्यांना संपूर्ण स्वायत्ता देणारे केंद्र सरकारला फक्त संरक्षण, परराष्ट्र व्यवहार आणि दळणवळण, एवढीच खाती सुपूर्द करणारी पर्यायी योजना कॅबिनेट शिष्टमंडळाने मांडली. याच हंगामी सरकारात कॉंग्रेसला सहा व लीगला पाच व इतरांना तीन जागा देण्यात येतील असे लॉर्ड वेव्हेल यांनी सांगितले. कॅबिनेट मिशन योजना जो पक्ष स्वीकारणार नाही त्याला हंगामी सरकारात स्थान असणार नाही हे स्पष्ट केले. कॉंग्रेस ही योजना नाकारेल आणि लीगला हंगामी सरकार स्थापन करता येईल अशी जीनांना आशा वाटत होती. लीगने प्रथम या योजनेला मान्यता दिली. परंतु कॉंग्रेस पुढाऱ्यांनी विशिष्ट अन्वयार्थासह कॅबिनेट योजना स्वीकारली आणि हंगामी सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. यावेळी जीनांचे सर्व अंदाज कोसळले. नेहरुंच्या भाषणाचे निमित्त करुन जीनांनी कॅबिनेट मिशन स्वीकारण्याचा लीग कौन्सिलचा ठराव रद्द करुन घेतला. पाकिस्तान हेच लीगचे ध्येय असल्याचे जाहीर करुन त्यासाठी प्रत्यक्ष कृतिदिन जाहीर केला.

मुस्लीम लीगने कॅबिनेट मिशन योजना फेटाळल्यानंतर पाकिस्तान निर्मितीसाठी प्रत्यक्ष कृतिदिन १६ ऑगस्ट १९४६ ला जाहीर केला. लेंगे लेंगे ' बॉट लेंगे! पाकिस्तान लेंगे!! ही या काळातील मुस्लीम लीगची घोषण होती. या दिवशी सर्व देशभर दंगली घडून आल्या. बंगाल व पंजाब या प्रांतात तर या दंगलीने धुमाकुळ घातला. याशिवाय भारतातील प्रमुख शहरी थोडयाफार प्रमाणात हेच घडून आले. महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे दंगली आटोक्यात आल्या. अखेर ३ जून १९४७ ला माऊंटबॅटन योजनेंतर्गत भारताची फाळणी झाली.

देशाची फाळणी झाली व ज्यासाठी ती केली गेली तो ही प्रश्न सुटला नाही. फाळणीनंतरचे रक्तपात, भयंकर हानी, निर्वासितांचे लोंढे, परस्परांचे गळे कापून बंधुतेचे केलेले विडंबन पाहून कोणीही सुबुध्द नागरीक फाळणीला जबाबदार असलेल्यांना दोष दिल्याशिवाय राहणार नाही. परंतु तत्कालीन परिस्थितीच अशी होती की दुसरा काहीच पर्याय नव्हता. अखंड हिंदुस्तानाचे स्वप्न भंग पावले. भारतीयांना स्वातंत्र्यांची जबर किंमत द्यावी लागली.

**संशोधन उद्दिष्टये -**

भारत पाकिस्तान फाळणीसंबंधी तत्कालीन नेत्यांचा तुलनात्मक अभ्यास हा संशोधन प्रबंधाचा विषय आहे. तत्कालीन नेते महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल, बॅ. महंमद अली जीना, मौलाना आझाद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मोजक्याच नेत्यांचा फाळणीसंबंधी वैयक्ति विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांचे विचार एकत्रित मांडून निष्कर्ष काढणे हे या संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत संशोधनाचा विषय भारत-पाकिस्तान फाळणीसंबंधी तत्कालीन नेत्यांचा तुलनात्मक अभ्यास असा आहे. यामुळे हे ऐतिहासिक संशोधन पध्दतीवर आधारित संशोधन आहे. प्रस्तुत संशोधनासाठी तत्कालीन नेत्यांच्या आत्मचरित्राचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी स्वातंत्र्यकालीन वर्तमानपत्रे व लेखांचा समावेश करण्यात आला असून प्रस्तुत संशोधनात तत्कालीन नेत्यांच्या भाषणाचा आढावा घेण्यात आला आहे.

भारताची फाळणी घडून गेली तरी काही प्रश्न अनुत्तरीत राहतात म्हणून तत्कालीन नेते महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, बॅ. महमंद अली जीना, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या मोजक्याच नेत्यांच्या फाळणीसंबंधी विचारांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे. स्वातंत्र्य लढयामध्ये या नेत्यांचे राजकीय वैचारिक योगदान महत्त्वाचे ठरते.